निम्न तापी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील अस्तित्वातील साने गुरुजी सहकारी उपसा जल सिंचन योजना, बोहरे ता. अमळनेर, जि. जळगांव पुर्नर्स्थापित करुन कार्यान्वित करणेच्या विशेष दुरूस्ती कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१६/ (प्र.क्र.१२/२०१६)/सिं.व्य.(कामे)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २५ जून, २०१९

वाचा :- कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांची पत्रे

१. जा.क्र. तापाविम / प्रशा-५/ ६४४७/सन २०१५, दि.३१.१२.२०१५.
२. जा.क्र. तापाविम / प्रशा-५/ ९२८/सन २०१७, दि.०१.०३.२०१७.
३. जा.क्र. तापाविम / प्रशा-५/ ३७६४/सन २०१७, दि.०४.०८.२०१७.
४. जा.क्र. तापाविम / प्रशा-५/ ५२१७ /सन २०१७, दि.०६.११.२०१७.
५. जा.क्र. तापाविम / प्रशा-५/ ६४८७ /सन २०१८, दि.१५.१२.२०१८.
६. शासन निर्णय क्र. उसिंयो-२०१३/(४२३/१३)/सिंव्य (म.), दि. ०७.०६.२०१६

प्रस्तावना :-

तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम १९९७ मधील १८(म) अन्वये धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हयातील २५० हेक्टरपेक्षा जास्त लाभक्षेत्र असलेल्या सहकारी उपसा सिंचन योजना त्यांच्या मत्ता व दायित्वे यासह चालविण्यासाठी व देखभालीसाठी ताब्यात घेणे आणि महामंडळाच्या खर्चाची रक्कम मिळाल्यानंतर सहकारी उपसा सिंचन संस्थांकडे परत करण्याची तरतूद आहे. धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हयातील ६४ उपसा सिंचन योजनांसाठी तापी नदी खो-यामध्ये उर्ध्व भागात प्रकल्प पूर्ण होत गेल्यामुळे पाणी वरच्या भागात अडवले गेले. त्यामुळे नदीतील प्रवाह कमी होत गेला त्यामुळे ज्या योजना पूर्णपणे उभारुन कार्यान्वित झाल्या होत्या त्यांच्या उर्ध्व ठिकाणी पाणी अपुरे पडत गेल्यामुळे योजांवरील सिंचित क्षेत्र कमी झाले व सदर योजना हळूहळू बंद पडल्या .

२. जळगाव जिल्हयाच्या अमळनेर तालुक्यातील निम्न तापी प्रकल्प, पाडळसे हा तापी खोरे अंतर्गत आहे. हा प्रकल्प मौ. पाडळसे, ता.अमळनेर, जि.जळगाव गावाच्या वरील बाजूस तापी नदीवर बांधकामाधीन आहे. निम्न तापी प्रकल्पाचे सांडवा बांधकाम १३९.२४ मी. पर्यंत झाल्याने १२.९७ दलघमी जलसाठा जून २०१४ अखेर झालेला आहे. सदर जलसाठ्यावर सद्यस्थितीत साने गुरुजी सहकारी उपसा सिंचन योजना कार्यान्वित होऊ शकते. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर १६०० हे. सिंचन क्षेत्र पुन:स्थापित होणार आहे.

३. सदर बाब विचारात घेता विशेष दुरुस्तीअंतर्गत निधी उपलब्ध करुन देऊन साने गुरुजी सहकारी उपसा सिंचन योजना पुनकार्यान्वित करण्याबाबतच्या प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाच्या दि.११ जून, २०१९ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

४. या अनुषंगाने सदर दुरूस्तीच्या कामाकरीता विशेष दुरुस्ती, विस्तार व सुधारणा अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव अंतर्गत जळगाव जिल्ह्याच्या अमळनेर तालुक्यातील निम्न तापी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील अस्तित्वातील साने गुरुजी सहकारी उपसा जल सिंचन योजना बोहरे ता. अमळनेर, जि. जळगांव पूनर्स्थापित करुन कार्यान्वित करणेच्या विशेष दुरूस्ती कामांसाठी विस्तार व सुधारणा अंतर्गत **(स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी) रू. ११,४९,८७,८९२**/- (रू.अकरा कोटी एकोणपन्नास लाख सत्याऐंशी हजार आठशे ब्याणव फक्त) एवढया खर्चाच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून सोबतच्या परिशिष्ट-१ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) शासन परिपत्रक क्र. प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिंव्य (कामे) दि. १.१.२०१५ मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे महामंडळावर बंधनकारक आहे.

२) शासन पत्र दि. ४.६.२०१६ अन्वये तपासणी सूचीतील मुद्दे आर्थिक निकष मा. राज्यपाल यांच्या निदेशानुसार १०% मर्यादेत निधी खर्च करणे, दायित्व निर्मिती मर्यादेत राहण्यासाठी कामाचे दोन वर्षाचे नियोजन करणे याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची असेल

३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय कि. उसिंयो-२०१३/(४२३/१३)/सिंव्य (म.) दि. ६.६.२०१६ मध्ये विहित करण्यात आलेल्या अटींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

४) सदर अंदाजपत्रकात कार्यकारी अभियंता, निम्न तापी प्रकल्प विभाग, चोपडा यांनी दि. ५/८/२०१८ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने तरतूदी केल्या आहेत. अंदाजपत्रकातील तरतूदींची मुख्य अभियंता यांनी त्यांच्या स्तरावरुन खात्री करावी.

५) स्थापत्य यांत्रिकी व विद्युत घटकांबाबत संबंधित मुख्य अभियंता यांनी खात्री करावी.

६) सदर अंदाजपत्रकात वस्तू व सेवा कराची तरतूद करण्यात आलेली नाही. तरी याबाबत महामंडळ स्तरावरुन पुढील निर्णय घ्यावा.

७) अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे/संकल्पन दरसुची बाह्यबाबी व वहन अंतर तपासून अंदाजपत्रकास सक्षमस्तरावर तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

८) प्रकल्पावरील पाणी वापर संस्थेकडे संपूर्ण लाभक्षेत्र हस्तांतरणाचे नियोजन काम सुरु करण्यापूर्वी करावे. कामे पूर्ण झाल्यानंतर लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरण करावे. याची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची असेल.

९) माती कामे व गवत झाडे/झुडपे काढण्याची कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध मशिनरीने करावीत.

१०) प्रस्तावित कामांमुळे खोदकामातून उपलब्ध होणारे बांधकाम साहित्याचा पूर्ण वापर करुन बचत साधावी.

११) कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावा.

१२) सदरच्या कामांचा कार्यारंभ आदेश काढण्यापासून कामे पुर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास त्वरीत उपलब्ध करुन द्यावे.

१३) तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम १९९७ कलम १८ (म) मधील तरतुदीनुसार निर्धारित केलेल्या अटी व शर्तीनुसार, महामंडळाने केलेल्या खर्चाची संपूर्ण रक्कम मिळाल्यावर , सहकारी उपसा सिंचन संस्थांकडे परत सोपविण्यात याव्यात. योजना पुनर्जिवित करण्यासाठी केलेल्या खर्चाची संस्थेकडून परतफेड करण्याबाबतचा तपशील महामंडळ स्तरावर निश्चित करावा.

१४) योजनांच्या विशेष दुरुस्तीची कामे तापी पाटबंधारे विकास महामंडळामार्फत पूर्ण करावीत.

१५) योजनांचे पुनर्जिवन झाल्यानंतर त्यांच्या देखभाल दुरुस्तीची व कार्यान्वयाची (Operation and maintenance) संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील, याबाबतचे लेखी बंधपत्र त्यांच्याकडून काम सुरु करण्यापूर्वी घ्यावे.

१६) उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात बारमाही पिकांना सूक्ष्म सिंचन पध्दतीचा वापर बंधनकारक करावा.

१७) संस्थेवरील दायित्व संपेपर्यंत या योजनेखाली येणाऱ्या जमिनीचे क्षेत्र हे अकृषिक करता येणार नाही.

१८) सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी घटकनिहाय मंजूर तरतूदीच्या मर्यादेत खर्च राहील याची जबाबदारी महामंडळावर राहील.

प्रस्तावित कामासाठी होणारा खर्च ४७०१ मोठे व मध्यम प्रकल्प यावरील भांडवली खर्च, (१२) विविध पाटबंधारे विकास महामंडळांना भागभांडवली अंशदान (विस्तार व सुधारणा) (१२) (०३) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (कार्यक्रम) (४७०१ जे १८५) या लेखाशीर्षाखाली करावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२४/१८ दिनांक १८.०५.२०१८ व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १/१४३४ दिनांक ०१.०१.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिं.व्य.(कामे) कार्यासनाच्या नोंदवही **क्र. १८** सन २०१९-२० मध्ये नोंदविण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०६२५१५१७१०५०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.06.25 15:21:28 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४. मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा,मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन, मुंबई,
६. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
७. मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
८. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई,
९. सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई,
११.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर,
१२.कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव,
१३.मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव,
१४.आंतरवित्त सल्लागार व उपसचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१५.अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,जळगाव,
१६.कार्यकारी अभियंता, निम्न तापी प्रकल्प विभाग,अमळनेर,
१७.सिं.व्य.(कामे) कार्यासन संग्रहार्थ.

परिशिष्ट -१

साने गुरुजी सहकारी उपसा जलसिंचन योजना बोहरे ता. अमळनेर, जि. जळगांव याची विशेष दुरुस्ती करुन ती पुन:कार्यन्वीत करणेच्या कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव

(अ) स्थापत्य कामाच्या अंदाजपत्रकात खालील बाबींची तरतूद करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	कामांचा तपशिल	प्र.मा.रक्कम (रूपयात)
१	२	३
१	सेवन झरा (इनटेक वेल) व वितरण कुंड	८१,००,२४८/-
२	सेवन नलिका (इनटेक पाईप लाईन)	३१,६२,६५६/-
३	ज़ॅक वेल	१३,०२,४०८/-
४	पंपगृह	४१,१९४/-
५	दाब नलिका (भाग १ व भाग २)	४५,८३,३४२/-
६	गुरुत्व नलिका	५६,१२,२८४/-
७	वितरण प्रणाली	३,९९,३६,५८७/-
८	रस्ता ओलांडण	१,४७,२२,५००/-
९	सर्वेक्ष्न	७१,७८,१७१/-
१०	**एकूण बांधकामाधिन खर्च**	**८४६३९३९०/-**
११	आकस्मिक खर्च ३%	२५,३९,१८२/-
१२	G.S.T १२ %	१,०१,५६,७२७/-
१३	**एकूण**	**९,७३,३५,२९८/-**

(ब) विद्युत कामाच्या अंदाजपत्रकात खालील बाबींची तरतूद करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	कामाचा तपशील	प्र.मा.रक्कम (रूपयात)
१	२	३
१	**भाग १**	
i	विद्युत उपकेंद्र	९०,१३३.६७/-
ii	११ के.व्ही. उच्च दाब वाहिनी	९४,२७१.९७/-
iii	ट्रान्सफ़ोर्मर	७,९०,६७८.३५/-
iv	केबल	२,१४,३७५.४५/-
v	आईसोलेटर पॅनल.	८७,१०४.७५/
	एकूण (भाग १)	**२१,४६,५६४.१९/-**
२	**भाग २**	
i	विद्युत उपकेंद्र	९,५४,६३३.८८/-
ii	११ के.व्ही. उच्च दाब वाहिनी	४८,३७,७८४.११/-
iii	ट्रान्सफ़ोर्मर	४,५५,८९१.६३/-
iv	केबल	१,४३,३६३.००/-

	एकूण (भाग २)	**६३९१६७२.६२/-**
	एकूण (१ + २) =	८५३८२३६.८१/-
४	महावितरण देखरेख शुल्क	१,१०,९९७.००/-
५	आकस्मिक खर्च	२,५९,४७७.००/-
	एकूण (३ + ४ + ५) =	**८९,०८,७११.००/-**

(१) **यांत्रिकी कामाच्या अंदाजपत्रकात खालील बाबींची तरतूद करण्यात आलेली आहे.**

अ.क्र.	**कामाचा तपशिल**	**प्र.मा.रक्कम (रूपयात)**
१	**२**	**३**
१	१६० अश्व शक्तीचे उभा पाणी पंप	७६,१६,१४२/-
२	६० अश्व शक्तीचा सेन्ट्रीफ़ुगल पंप	११,२७,७४१/-
३	**एकूण (१ + २) =**	८७,४३,८८३/-
	एकूण (स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी)	**११,४९,८७,८९२/-**

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef,
serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.06.25 15:22:15 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव